بسم الله الرحمٰن الرحيم نحمده ونصلي على رسوله الكريم وعلى عبده المسيح الموعود
لا اله الا الله محمد رسول الله
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांच्या आशीर्वादित वचनांच्या प्रकाशात दुःख व अवघड परिस्थितीत संयम बाळगण्याचे उपदेश. जर प्रत्येक आपापली जबाबदारी समजून घेईल तर अनेक समस्यांचे निरसन आमच्या कथनी व करणीद्वारे दूर होतील.

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक २८ अप्रैल २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُولُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيمِ. بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيمِ. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ. الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ. إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ. صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ.

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिहा च्या पठनानंतर हुजूर अनवर म्हणालेः काही लोक मला अनेक युक्तिवादासह लिहितात की पाकिस्तान किंवा इतर ठिकाणी जमाअतवर होणाऱ्या अत्याचारांविरूद्ध धीर न धरता काही प्रतिक्रिया दाखवली पाहिजे आणि याविषयी ते हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) चे उदाहरण देतात की कार्ही ठिकाणी त्यांनी परवानगी दिली (होती). हूजूर अनवर म्हणाले, त्यांच्यावर केलेले हे विधान पूर्णपणे चुकीचे आहे. त्यांनी नेहमी कायद्याच्या चौकटीत राहून विचार मांडले, उगीच दंगलखोरांसारखी मिरवणूक काढायला परवानगी कधीही दिली नाही. जर कोणत्याही परिस्थितीत निषेध झाले तर ते खलिफाच्या परवानगीने. कोणत्याही पदाधिकाऱ्याने लोकांना एकत्र करून आंदोलन सुरू केले, असे कधीही दृश्यात आलेले नाही.

फाळणीपूर्वी भारतात जेव्हा इंग्रजांची सत्ता होती आणि आमच्या विरोधी अधिकाऱ्यांनी हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) यांच्या भाषणांना प्रक्षोभक व भडकाऊ ठरविण्याचे प्रयत्न केले होते जेणे करून त्यांच्यावर प्रशासनिक कैद लावली जावे, परंतु ते अधिकारी प्रत्येक वेळी अयशस्वी ठरले कारण हजरत मुस्लेह माऊद (र.ज.)नी विरोधकांना नेहमीच त्यांच्या कृती त्यांच्यासमोर प्रस्तूत केल्या, आणि जमाअतला संबोधून म्हणत असे की, प्रेषितांच्या अनुयायींचे कर्तव्य आहे की त्यांनी संयम बाळगावे आणि कायद्याचे पालन करावे. तर मग हे कसे

होऊ शकते की हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) इस्लाम आणि अपेक्षित मसीहाच्या शिकवणूकी विरुद्ध बोलतील!

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी अनेक ठिकाणी संयम आणि दुआ करण्याचे उपदेश दिले आणि सांगितले की ज्यांचे पाय नाजूक आहेत आणि काटेरी व खडतर वाटेवर माझ्याबरोबर चालू शकत नाहीत त्यांनी मला सोडून द्यावे. म्हणून हे संयमच आहे ज्याने जगामध्ये जमाअतची ओळख इतरांपासून वेगळी करून दाखवली आहे.

मी बऱ्याच मुलाखत आणि संभाषणात वारंवार उत्तर देतो की जे आम्हाला दुःख देत आहेत, जे आमच्यावर अत्याचार करत आहेत त्यांच्यामधील बरेच नंतर जमाअतमध्ये सामील होतात. सांगण्याची गोष्ट एवढीच की आम्ही देखील त्यांचा कठोर प्रतिउत्तर देऊ शकतो; पण आम्ही तर युगाच्या अवताराला स्वीकार केले आहे, ज्यांनी शांती स्थापना आणि परमेश्वराच्या कृपांचे वारस होण्यासाठी अशी शिकवण दिली होती की माझ्या अनुयायींनी सदैव शांतीमार्ग अनुसरावा; परंतु कायद्याच्या अधीन राहून आपले हक्क मिळवण्याचा प्रयत्न देखील करावा. त्यामुळे हे स्पष्ट झाले पाहिजे की हा पैगंबरांचा इतिहास आहे आणि हीच हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) कडून आम्हाला लाभलेली शिकवण आहे की सदैव संयम बाळगा. हे उत्तर ऐकून लोक आश्चर्य होतात आणि कौतुकही करतात की शांतीप्रिय लोकांची अस्सल प्रतिक्रिया हीच असते.

हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) यांनी संयम ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट असल्याचे वर्णन केले आणि ते म्हणाले की, हे पैगंबरांच्या समुदायांचे सर्वात महत्वाचे आणि सर्वप्रथम कर्तव्य आहे, त्याशिवाय कोणताही समुदाय प्रगती करू शकत नाही किंवा जगाला त्यांचे अनुसरण करण्यास भाग पाडू शकत नाही. आणि हे कर्तव्य बजावल्याशिवाय यश प्राप्त होत नाही.

हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) म्हणतात की, संयमाचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे संयम जेव्हा एखाद्या व्यक्तीमध्ये प्रतिक्रिया देण्याची शक्ती असते तरीही तो संयम दाखवतो. सामर्थ्य असताना धीर धरणे म्हणजे जुलुमांना प्रत्युत्तर न देणे आणि अल्लाहसाठी संयम दाखवणे, आणि मजबुरीचा संयम म्हणजे शक्ती नसताना नैसर्गिक आपत्तींच्यावेळी अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्याच्या उद्देशाने संयम बाळगणे. अल्लाहने वेगवेगळ्या ठिकाणी संयमाचा सल्ला दिला आहे. अल्लाहच्या आदेशांना समोर ठेवून संयमाचे तीन अर्थ आहेत. पहिला म्हणजे पाप पासून

परावृत्त राहणे आणि त्याकरिता प्रयत्नशील असणे. दुसरा सत्कर्मात दृढ राहणे. तिसरा प्रत्येक प्रकारच्या रडणे-ओरडण्यापासून दूर राहणे. प्रथम अर्थ, जे त्याला त्याच्याकडे खेचत आहेत आणि भविष्यात त्याच्याकडे ओढल्या जाणाऱ्या वाईट गोष्टींसाठी तयार आहेत. दुसऱ्या शब्दांत, माणसाने त्याला मिळालेल्या चांगल्या गोष्टींवर स्वावलंबी राहून उभे राहिले पाहिजे आणि अद्याप मिळालेल्या नाहीत त्यांसाठी प्रयत्न केले पाहिजेत. हा देखील एक प्रकारचा संयम आहे जो एखाद्या व्यक्तीला सर्वशक्तिमान अल्लाहच्या जवळ आणतो आणि ही जवळीक केवळ प्रार्थनेद्वारे प्राप्त केली जाऊ शकते.

सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो: وَاسْتَعِيْنُوْا بِالصَّبْرِ وَالصَّلٰوةِ ؕ وَاِنَّهَا لَكَبِيْرَةٌ اِلَّا عَلَى الْخٰشِعِيْنَ अर्थात- आणि सहनशीलता व प्रार्थना याद्वारे अल्लाहकडे सहाय्याची याचना करा. आणि खरोखर पाप भिरु लोकांव्यतिरिक्त इतर लोकांच्यादृष्टीने ही कठीण गोष्ट आहे. अल्लाहचा भय बाळगणारे आणि त्याच्यासमक्ष विनम्र राहणारेच सहनशीलतेचे प्रदर्शन करू शकतात, ते देखील त्याची प्रसन्नता प्राप्तीसाठी. पुढे अल्लाह फरमावितो,

وَالَّذِيْنَ صَبَرُوا ابْتِغَآءَ وَجْهِ رَبِّهِمْ وَاَقَامُوا الصَّلٰوةَ وَاَنْفَقُوْا مِمَّا رَزَقْنٰهُمْ سِرًّا وَّعَلَانِيَةً وَّيَدْرَءُوْنَ بِالْحَسَنَةِ
السَّيِّئَةَ اُولٰٓئِكَ لَهُمْ عُقْبَى الدَّارِ

आणि ज्यांनी आपल्या विधात्याची कृपा संपादन करण्याकरता खडतर प्रयत्न करतात व नित्य प्रार्थना करतात (नमाज पढतात) आणि जे काही आमही त्यांना दिलेले आहे त्यातून ईशमार्गात जाहीरपणे व गुप्तपणे खर्च करतात आणि चांगल्या गोष्टींद्वारे वाईट गोष्टींना दूर करतात. हेच ते लोक आहेत ज्यांना अंतिम निवासस्थानांचे चांगले फळ मिळेल. म्हणून सहशीलता, नम्रता, सातत्य आणि प्रार्थनाद्वारे परमेश्वराची प्रसन्नता प्राप्त करण्याचे नाव आहे. जेव्हा आपण आपली परिस्थिती अल्लाहकडे वळवू आणि त्याच्या शिकवणूकीद्वारे आपले जीवन जगू आणि अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करणे हे आपले ध्येय ठरवू.

आम्हांवर अत्याचार राखून आणि आमच्या व्यवस्थापनांवर निर्बंध लावून आम्हाला प्रतिकार करण्यास उद्युक्त करण्याची इच्छा विरोधींची असते. अशावेळी काही सरकारी अधिकारी विरोधकांना पाठींबा देत असतात, त्यामुळे अशा प्रतिक्रियांमुळे परिस्थिती आणखी बिघडण्याचा अंदाज असतो. जमाअतच्या इतिहासात अशा काही घटना आहेत जिथे प्रतिकार केल्यावर अशा जमाअतला नुकसान सोसावे लागले, पण जेव्हा संयमाने परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला

गेला, तेव्हा त्याचा खूप फायदाही झाला. अशाप्रकारे काही अधिकाऱ्यांवर त्याचा सकारात्मक परिणामही झाला. आपल्या प्रतिकारामुळे लोकांवर वाईट परिणाम पडतो, विशेषकरून ज्यांना अहमदियतचा संदेश दिले जात आहे आणि मग हे पाहून त्यांना हे सांगण्याची संधी मिळेल की हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) काय बदलण्यासाठी आणि काय नूतनीकरण करण्यासाठी धाडले होते की आम्ही त्यांच्यात सामील होवू? म्हणून लक्षात ठेवा की समाजाच्या मोठ्या भल्यासाठी प्रत्येक अत्याचाराला सहन करा. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी आम्हाला हीच देणगी प्रदान केली आहे आणि हाच उपदेश दिला आहे की प्रत्येक प्रतिकूल परिस्थितीचा सामना तुम्ही सहनशीलता व धैर्याने करा.

पहा पवित्र पैगंबर (स.) च्या काळात, प्रेषित (स.) आणि त्यांच्या सोबतींचा संयम पाहूनच अनेकांनी धर्म स्वीकारला. ही उदाहरणे हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) च्या काळात देखील आढळतात की त्यांचे आचार व संयम पाहून बरेच लोक त्यांच्या जमाअतमध्ये सामील झाले आणि आजही तेच पहायला मिळते. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की, आमच्या जमाअतला तशीच अडचणी आहेत जशी प्रेषित मुहम्मद (स.) यांना आल्या होत्या. लक्षात ठेवा की अशा प्रकारच्या अडचणींना तोंड देणे आवश्यक आहे जेणेकरून सर्वशक्तिमान ईश्वरावरील विश्वास दृढ व्हावा आणि पवित्र परिवर्तनाची संधी मिळेल. मी तुम्हाला सूचित करू इच्छितो की, जो कोणी या जमाअतमध्ये राहून संयम आणि सहनशीलता अंगीकारत नाही त्याचा या समुदायात समावेश नाही. तुमची बाब देवाला सोपवा. अपमान ऐकूनही धीर धरा, जेव्हा मी धीर धरतो तेव्हा धीर धरणे तुमचेही कर्तव्य आहे.

आज हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) चा संदेश जगातील प्रत्येक देशात पोहोचला आहे आणि जमाअतची स्थापना झाली आहे, हे कोणत्याही प्रतिक्रिया किंवा शक्तीच्या प्रदर्शनामुळे नाही तर त्याग, संयम आणि प्रार्थना याचे परिणाम आहे. म्हणून संयम दाखवायला हवा.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की, मोज़ेसच्या लोकांनी त्यांना लगेच स्वीकारले. म्हणून, त्यांना लोकांकडून कोणत्याही अडचणींना तोंड द्यावे लागले नाही, परंतु पवित्र पैगंबर (स.) यांना त्यांच्या स्वतःच्या लोकांकडून नकार आणि अडचणींचा सामना करावा लागला. पवित्र प्रेषितांच्या दुःखांची मालिका सतत तेरा वर्षे चालू राहिली, परंतु सर्वशक्तिमान अल्लाहने त्यांना धीर धरण्याची

आणि स्थितप्रज्ञ राहण्याची सूचना दिली होती. जसे पूर्वीच्या संदेष्ट्यांनी धीर धरला त्याप्रमाणे त्यांना वारंवार धीर धरण्याचा आदेश देण्यात आला. त्यामुळे ते कधीही आळशी झाले नाही आणि नेहमी प्रगतीशील राहिले.

एका गावातील एक अहमदी हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) यांच्या सेवेत आला आणि म्हणाला की माझ्या गावातील मदरसामध्ये काम करणारा एक मौलवी प्रबळ विरोधक आहे आणि मला खूप त्रास देत आहे, हुजूर त्याची बदली होण्यासाठी प्रार्थना करा. हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) हसले आणि म्हणाले की, या जमाअतमध्ये समाविष्ट झाल्यानंतर आदेशित शिकवणूकींचे पालन करा. तुम्हाला त्रास होत नसेल तर तुम्हाला बक्षीस कसे मिळेल? पवित्र पैगंबराने तेरा वर्षे त्रास सहन केला, पण त्यांनी सोबतींना संयम व सहनशीलतेचे उपदेश दिले. अल्लाहने या पवित्र जमाअतला जगात प्रसार करण्याचा हेतू ठेवला आहे आणि याद्वारे तो तुम्हाला संयम शिकवू इच्छित आहे. थोड्या काळच्या संयमानंतर तुम्हाला दिसेल की जी व्यक्ति अत्याचार करत होता तो पश्चाताप करेल किंवा त्याचा नाश होईल. सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो की जे धीर धरतात त्यांना अगणित बक्षिसे मिळतात. पुढे म्हणाले की सांसारिक लोक भौतिक वस्तूंवर विसंबून आहेत, परंतु ईश्वर कोणावरही अवंलबून नाही. म्हणून आपल्या कृतींना पवित्र करा आणि निष्काळजी बाळगू नका. निष्काळजी करणारा सैतानाला बळी ठरतो. पश्चात्तापाला जिवंत ठेवा जेणेकरून ते निरुपयोगी ठरू नये. खरा पश्चात्ताप एखाद्या चांगल्या बीजासारखा आहे जो वेळेवर फळ देतो. आम्हाला तर अल्लाहकडून संयमसाठी पाठवले आहे. तुम्ही प्रार्थना करा की अल्लाह त्यांना सन्मार्ग दाखवो. म्हणून आमचे यश देखील त्यांच्या अनुकरणावरच आधारित आहेत.

पुढे म्हणाले की क्षमा, पश्चात्ताप, धार्मिक शास्त्रांचे ज्ञान, सर्वशक्तिमान ईश्वराचे प्रभुत्व आणि पाच वेळी नमाज अदा करणे ही आपल्या विजयाची शस्त्रे आहेत. हेच ते उपदेश आहेत जे आमच्या यशाचे आणि प्रगतीचे आधार आहेत. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांच्या शब्दांनुसार, जर आपण या उपदेशांकडे योग्य प्रकारे लक्ष देत असेल तर आमची विजय आहे. आमची विजय इन्शाल्लाह होणार आहे. जर प्रत्येक आपापली जबाबदारी समजून घेईल तर अनेक समस्यांचे निरसन आमच्या कथनी व करणीद्वारे दूर होतील. अल्लाह आम्हांला संयम बाळगण्याचे आणि प्रार्थना करण्याचे सामर्थ्य प्रदान करो आणि त्याची प्रसन्नता

प्राप्त करण्यासाठी त्यांनी विहित केलेल्या आदेशांचे पालन करण्याची क्षमता प्रदान करो.(आमीन)

اَلْحَمْدُ لِلّٰهِ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ أَنْ لَّآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ،
عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِي الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ
لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ۔